CNR-MHNG-100003062024

नियमीत.दि. दावा क्र.२४/२०२४

विजय – विरुध्द – दुर्गेश

## निशाणी क्र. ११ व १२ वर आदेश
## (पारित दिनांक ०८ एप्रिल,२०२६)

अर्ज व त्यावरील खुलाशाचे अवलोकन केले, युक्तीवाद ऐकला.

**अर्ज :**

२. प्रस्तुतचा अर्ज हे प्रतिवादी यांनी कैफियत दाखल करण्यासाठी परवानगी मिळावी यासाठी दाखल केली. व दस्तावेज पुरविण्यात यावे, या साठी दाखल केली. प्रतिवादी यांना कैफियत दाखल करावयाची आहे. त्यामुळे तहकुब करावे, अशी त्यांनी विनंती केली. तसेच नि.क्र. १२ चा अर्ज हा वादी यांनी प्रतिवादी यांना दस्तावेज पुरवावे यासाठी त्यांना निर्देश देण्यात यावे, या आशयाचा आहे. सबब, अर्ज मंजुर करावे, अशी त्यांनी विनंती केली आहे.

**खुलासा :**

३. प्रस्तुत अर्जावर वादी यांनी खुलास दाखल केला नाही.

४. युक्तीवाद ऐकून घेऊन प्रकरणाचे अवलोकन केले. दावा हा जाहीर घोषीत होऊन मिळण्यासाठी व निंरतरच्या मनाई हुकुमासाठी दाखल केला आहे. प्रतिवादी यांनासमंसची बजावनी झाली परंतु, त्यांनी कैफियत दाखल केली नाही. म्हणून त्यांच्या विरुध्द न्यायालयो दि. ०८.०४.२०२४ रोजी एकतर्फा आदेश पारीत केला आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र. १ व २ हे विधीज्ञांसह दि. १४.०८.२०२४ रोजी हजर झाले. त्यांनी नि.क्र. ९ अन्व्ये वकीलपत्र दाखल केले. त्यानंतर प्रस्तुतचे अर्ज दाखल केले.

५. प्रतिवादी यांना कैफियत दाखल करण्यासाठी वेळ हवा आहे, असे अर्जात नमुद केले आहे. तसेच त्यांना वादी यांच्याकडून काही दस्तावेज घेण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी वादी यांना निर्देश द्यावे, असे नि.क्र. १२ च्या अर्जात नमुद आहे. एकतर्फा आदेश हा प्रतिवादी क्र. १ व २ विरुध्द दि. ०८.०४.२०२४ रोजी झाला. तब्बल चार महिन्यानंतर अर्ज दाखल केला. अर्ज कायदेशिर नाही. सबब, खालील प्रमाणे खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**: आदेश :**

**१** अर्ज नि.क्र. ११ व १२ हे खारीज करण्यात येतात.

Sd/-

**उमरेड.** **( रा.भा.डोळे )**

**दिनांक : ०८.०४.२०२६** **सह. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उमरेड.**